# ''काश्मीर समस्या – एक आढावा''

**प्रा. अरुण बी. आलेवार**
इतिहास विभाग प्रमूख
डॉ. अरुण मोटघरे महाविद्यालय,
कोंढा–कोसरा, ता.पवनी, जि. भंडारा
महाराष्ट्र. **भारत**

**सारांश–**

भारताच्या स्वातंत्र्याबरोबर देषाची फाळणी होऊन भारत आणि पाकिस्तान एकमेकांपासून वेगळे झाले. पण जम्मु काष्मिरचा विवाद भारतापुढे पाकिस्तानने निर्माण केला. काष्मीर प्रष्न हा आज अत्यंत संवेदनषील प्रष्न आहे. भारत – पाक संबंधच्या दृश्टीने अतिषय कठीण बनलेल्या काष्मीर प्रष्नामुळे भारताला अंतर्गत प्रष्नांना सामोरे जावे लागत आहे. काष्मीर भारताचा प्रदेष असुनही काही फूटीरतावादी गट धर्माच्या नावाखाली वेगळा प्रांत निर्माण करण्यास प्रयत्नषील आहेत. हयांच्या प्रयत्नांना पाकिस्तानचे समर्थन मिळत आहे. पाकिस्तान गेल्या पन्नासच्या दषकापासुन आतापर्यत काष्मीरवर आपला दावा केला आहे. 1947 मध्ये 370व्या कलमानुसार जम्मू काष्मीरला विषेश राज्याचा दर्जा देण्यात आला. विषेश दर्जा मिळूनही देखील जम्मू – काष्मीरचा प्रष्न सूटला नाही. पाकिस्तानकडून होणारे आक्रमण व दहषतवादी संघटनांना षस्त्राची आणि आर्थिक मदत दहषदवाद्याना प्रषिक्षण यासारख्या कारवायामुळे काष्मारमध्ये षांतता प्रस्थापित झाली. यामुळे हजारो काष्मीरमधील लोकांचा बळी घेतला आहे. आजही लोकांतध्ये भितीचे वातावरण आहे. भारताने काष्मीरबाबत अनेकदा राश्ट्रसंघाकडे तक्रार करून पाकिस्तानच्या कृतीला पायबंद बसलेला नाही. पंडित नेहरूच्या काळापासुन तो आजपर्यत भारताने चांगले संबंध ठेवण्याचा सतत प्रयत्न केला. युध्द नको प्रस्ताव पाकिस्तानपुढे ठेवला, परंतु पाकिस्तानने प्रत्येक वेळी संधीसाधू धोरण स्विकारले. अमेरिका व पाष्चिमात्य राश्ट्राच्या समर्थनामुळे पाकिस्ताने काष्मीर प्रष्न गुंतागुंतीचा करून ठेवला. आंतरराश्ट्रीय संघटनेत पाकिस्तान काष्मीर प्रष्न उपस्थित करीत असतो. भारत पाकिस्तान यांच्यात जोपर्यत मैत्रीचे संबंध प्रस्तापित होणार नाही. तोपर्यत काष्मीर प्रष्न सुटणार नाही. काष्मीर प्रष्नाविशयी राश्ट्रसंघ बऱ्याचदा अपयषी ठरत असल्याने काष्मीर विवाद जैसे थे आहे.

**प्रस्तावना–**

इंग्रजी सत्तेच्या जोखडातुन भारत १५ ऑगस्ट १९४७ ला स्वतंत्र झाला. पण मात्र भारतीय जनतेच्या चेहऱ्यावरील आनंद जास्त काळ टिकून राहिले नाही. कारण भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अनेक आव्हाने होती. भारतीय संस्थानाच्या विलिनिकरणाचा प्रश्न, फाळणीतुन निर्मित हिंसाचार व निर्वासितांच्या समस्या, आर्थिक मागासलेपणा, गरिबी अशा अनेक समस्या निर्माण झाल्या. त्यात भर पडली ती काश्मीर प्रश्नाची. काश्मीर हे भारताचे अविभाज्य अंग आहे. काश्मिरप्रांत लष्करी व भौगोलिकदृष्टया अत्यंत महत्वाचा आहे. कारण काश्मीरला तिबेट, चीन व पाकिस्तानच्या सिमा लागून आहेत. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात काश्मिरचा शासक हरिसिंग होता. त्याने जैसे थे कराराच्या माध्यमातुन काश्मीरला भारत व पाकिस्तानपासून वेगळे ठेवले. परंतु पाकिस्तानने काश्मिर खोऱ्यात घुरखोर पाठविले. तेव्हा पाकिस्तानच्या घुसखोरांचा सामना काश्मीरी सैन्य करू शकले नाही. त्यामुळे महाराजा हरिसिंगाने काश्मीर मध्ये सुरू असलेले घुसखोरांचे तांडव रोखण्यासाठी २४ ऑक्टो. १९४७ ला भारत सरकारकडे तातडीची मदत मागितली होती. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून महाराजा

हरिसिंगाना जम्मुला आणण्यात आले तर व्ही.पी.मेनन व मेहरचंद महाजन दिल्लीला आले. २५ ऑक्टो. १९४७ रोजी भारत सरकारशी वाटाघाटी करून जम्मु काश्मिर भारतात विलीन केल्या गेले. पण या विलीनकरणाला पाकिस्तानने जोरदार विरोध केले. त्याचवेळेस भारतीय लष्करांनी जम्मू–काश्मीरमध्ये चालू असलेले घुरखोरांचे प्रयत्न हाणून पाडले. भारतीय सैन्य बारामुल्ला जिंकून उरी प्रांतापर्यंत पोहचले. त्यापूर्वीच टोळीवाल्यांनी लेह व पूंछ विभागात लढा दिला. मात्र भारतीय लष्करा पूढे टोळीवाल्यांचा निभाव लागला नाही. तेव्हा प्रत्यक्षात भारत–पाक युध्दाला सुरूवात झाली. झालेल्या युध्दात भारताने पाकिस्तानच्या सैन्यांना पिटाळून लावले, आणि १९४८ मध्ये पाकिस्तानच्या काश्मिरवरील आक्रमणाची तक्रार भारताने सुरक्षा समितीकडे केली. सुरक्षासमितीने दोन्ही देशात सामंजस्य निर्माण करण्याच्या दृष्टीने पावले उचलली. मात्र पाकिस्तानच्या टोळयांनी काश्मिरचा बराचसा भूभाग जिंकून घेतला तो भूभाग आझाद कश्मिर म्हणून ओळखला जातो. १९४७ पासून ते २०१५ पर्यंत काश्मिरवर पाकिस्तानचे हल्ले सुरूच आहेत. कित्येकदा भारत सरकारने पाकिस्तानची युनोकडे तक्रार केली. तरीही सुध्दा काश्मीरचा प्रश्न युनोत भिजत पडलेला आहे. त्यावर तोडगा काढणे युनोलाही शक्य झाले नाही. कारण पाकिस्तानच्या कृतीला अमेरिकेसारख्या बलाढय राष्ट्राची आतून मदत मिळत असल्याने काश्मीर प्रश्न दिवसेंदिवस गुंतागुंतीचा बनत चालला आहे. याचा फटका काश्मीरमधील लाखो लोकांना बसला आहे. आजही जम्मु–काश्मीरमधील जनता जीव मुठीत घेऊन जगत आहेत.

**संशोधनाची उदिदष्टे**

१. काश्मीर प्रश्नाच्या उदयाच्या संबंधाने अधयन करणे.
२. काश्मीर प्रश्न गुंतागुतींच्या करुन ठेवण्यामागे पाकिस्तान व राष्ट्रसंघाच्या भूमिकेचे अधयन करणे.
३. काश्मीरवरील वारंवार होणाऱ्या दहशदवादी हल्ल्यांचा काश्मीरी जनतेच्या जनजीवनावर पडलेल्या प्रभावाचा अभ्यास करणे.
४. काश्मीर प्रश्नांबाबत भारताची भूमिकेचे अधयन करणे.
५. आतंरराष्ट्रीय राजकारण व काश्मीर प्रश्न यांचा अधयन करणे.
६. आज काश्मीरमध्ये निर्माण झालेल्या परिस्थितीचा अधयन करणे.

**संशोधन पद्धती :–**

संशोधन कार्याचे उद्दीष्ट पुर्ततेसाठी एतीहासीक तसेच काश्मीर प्रश्नांशी संबंधीत प्राथमिक व दुय्यम साधनाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. विविध मासिकांचा आधार घेण्यात आलेला आहे.

**१९४८ ते १९६५ हया काळातील काश्मीर प्रश्न–**

काश्मीरच्या प्रश्नाबाबत १९४८ साली युनोकडे भारताने पाकिस्मानची तक्रार केली. पण भारताच्या तक्रारीकडे व काश्मिर प्रश्नातील पाकिस्तानच्या सरळ हस्तक्षेपाकडे काना–डोळा करून अमेरिका व इंग्लंड दबावात येऊन सुरक्षा परिषदेने हया प्रश्नाला भारत–पाकिस्तान विवादाचे स्वरूप दिले. एवढेच नव्हे तर भारत–पाकिस्तान यांच्या नियंत्रण रेषा ठरवून दिल्या गेली. तरी सुध्दा पाकिस्तान अतिरेक्यांचे काश्मिर मिळविण्याच्या दृष्टीने हल्ले सुरूच होते.

पंडित नेहरूंनी अलिप्तता धोरणाचा स्विकार केला. त्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय राजकारणात स्वताचे वेगळे अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मात्र १९५४ ला पाकिस्तान–अमेरिका यांच्यातील लष्करी करारामुळे जबरदस्त झटका बसला. मग पुढे भारताने रशियाशी मैत्री प्रस्थापित केली. म्हणुनच रशियाने काश्मिरबाबत भारताची बाजु उचलून धरली. पाकिस्तानमध्ये जनरल अयुबखानची सत्ता प्रस्थापित झाल्यावर भारत पाकिस्तान संबधांत सुधारणा करण्यासाठी अयुबखनाने १९५९ ला भारताला भेट दिली मात्र तिकडे अमेरिका व चीनसोबत सलगी वाढवून अयुबखानाने अत्याधुनिक

शस्त्रास्त्रे मिळविले. १९६१ ला काकासाहेब गाडगीळांनी पाकिस्तानला शिष्टमंडळासमवेत भेट दिली. त्या भेटीदरम्यान अयुबखनाने काश्मीर प्रश्न सोडविण्याबाबत चर्चा घडून आली पण पुढे मात्र पाकिस्तानचा व्यवहार वेगळाच दिसून आला. १९६२ ला झालेल्या चीन–भारतयुध्दात भारताला पराभव स्विकारावा लागला. चीनने पाकिस्तानबरोबर चार महिन्यांच्या आत २ मार्च १९६३ ला सिमाकरारावर स्वाक्षऱ्या केल्या भविष्यात होणाऱ्या यांच्या दृष्परिणामांनी पं.नेहरू व भारताला पुन्हा मोठा धक्का बसला.

पाकिस्तान काश्मीर मिळविण्याच्या हेतूने १९६५ ला भारतावर आक्रमण केले. भारताने सुध्दा तेवढयाच ताकदीने जोरदार मुसंडी मारली. १९६५ च्या पाकिस्तान युध्दात भारतावर दबाव वाढविण्यासाठी चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने अचानक पणे भारताकडे खलिता पाठवून तक्रार केली की, चीनच्या ४० बकऱ्या व डझनभर याक भारतीय सरहद्दीतून गायब झाले, ७२ तासात त्याची भरपाई झाली पाहिजे असा निर्वाणीचा इशारा चीनने दिला. ४० बकऱ्या व डझनभर याक भारताने पळविले नाही असे स्पष्ट केले व इशारा धुडकावून लावला. या कृतीतून पाकिस्तानला आपला पाठिंबा आहे, असा संकेत चीनला द्यायचा होता. पण भारताने चोख प्रत्युत्तर दिले तेव्हा पाकिस्तानने या युध्दातून माघार घेतली. या कृतीला युनोने पाकिस्तानला जबाबदार धरले. सरतेशेवटी ताश्कंद भारत व पाकिस्तान मधील शांततेचे संबंध प्रस्थापित होण्यासाठी रशियाने मध्यस्ती केली. तर इंग्लंडने पाकिस्तानची बाजु घेतल्याने भारत–इंग्लंड संबंधात दुरावा निर्माण झाला.

**१९७१ ते २००० मधील काश्मीर प्रश्न–**

ताश्कंद कराराला पाहिजे त्या प्रमाणात पाकिस्तानने सहकार्य केले नाही. त्यामुळे पाकिस्तानने ताश्कंद कराराला मोडून १९७१ ला भारताच्या पठाणकोट, श्रीनगर, अमृतसर हया शहरावर हवाई हल्ले करून युध्दाचे बिगुल वाजविले. इंदिरा गांधींनी त्वरित पाऊले उचलून भारतीय सैन्यांनी करारी उत्तर पाकिस्तानला देण्याची वेळ आली आहे अशी घोषणा केली. म्हणुन भारतीय फौजानी जलद गतीने कारवाई केली. भारतीय सेनेपुढे पाकिस्तानी फौजा जास्त काळ टिकाव धरू शकल्या नाही. नंतर पाकिस्तानने शरणागती पत्कारली. यावेळी सुध्दा अमेरिकेने पाकिस्तानला उघडपणे पाठिशी घातले. तर रशियाने भारताचे समर्थन केले २८ जून १९७२ साली सिमला करार अस्तित्वात आला. या नुसार जम्मु–काश्मिरच्या बाबतीत नियंत्रण रेषा घोषित करण्यात आली. हया नव्या नियंत्रण रेषेचा कोणीही उल्लंघन करणार नाही असे ठरले. परंतु या कराराचे अनेकांनी जेवढे स्वागत केले तेवढेच या करारावर टिका सुध्दा केल्या गेली. प्रत्येक युध्दात पाकिस्तानला पराभव स्विकारावा लागला असला तरी मात्र काश्मिरमध्ये अस्थिरता निर्माण करण्यात गुंतलेला होता. १९८० च्या दरम्यान जम्मू–काश्मिर प्रांतात इस्लामी राजवट स्थापन करण्याच्या हेतूने इंडियन मुजाहिद्दुने स्वत:चा अजेंडा तयार केला होता. त्यानुसार पाकिस्तानमधील तरूणांना जिहादाच्या भावनेने प्रेरित करणे, प्रशिक्षण देणे व नंतर त्यांना भारतात पाढविले जाई यामुळे जम्मु–काश्मीर भागात सतत हिंसाचार, दहशतवादाची चिन्हे कायम राहीली. या सर्वकृत्याला पाकिस्तानचा उघड पाठिंबा होता. त्याचप्रमाणे जम्म–ुकाश्मीर मधील फुटीरतावादी गटांना हाताशी धरून हल्ले करणे सुरूच राहिले. अशा प्रकारे पुन्हा पाकिस्तानने १९८४ ला सियाचीनवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न केला पण त्यातही ते अपयशी ठरले. १९९० मध्ये भारताच्या पंतप्रधानाने अमेरिकेला काश्मीर प्रश्नात हस्तक्षेप करण्याची विनंती केली. तेव्हा अमेरिकेने कुठलाही प्रतिसाद दिला नाही. १९९९ च्या कारगील युध्दात भारतासमोर पाकिस्तान तोंडघशी पडला. हया संघर्षामुळे परस्पसंबंध अधिकच बिघडले तरीही सुध्दा लष्कर–ए–तोयबा, रझाकार, संघटनाना सर्वोतोपरी मदत करून जम्मू–काश्मीरचे जनजीवन प्रभावीत करणे सुरूख होते. २००० मध्ये अमेरिकेचे राष्ट्ध्यक्ष बिल क्विंटन यांनी पाकिस्तानने दहशतवादी कारवायांना समर्थन देण्याचे थांबवावे असा निर्वानीचा इशारा दिला होता. त्यामुळे थोडया कालावधीसाठी कारवाया थांबल्या होत्या. अशारीतीने १९९७ जे २००० या काळात विविध संघटनांना आर्थिक सहाय्य करून पाकिस्तानने भारताविरूद्ध अघोषित युद्ध सुरू ठेवले. भारताविरूद्ध सुरू असलेल्या हया कारवायांना लष्करी संघटना 'जिहाद' म्हणतात. आणि असा प्रसार करतात की,

इस्लाममध्ये राजकारण म्हणजे धार्मिक दृष्टीने छोटीशी हालचाल आहे. भारताचा मात्र दावा असा आहे की, काश्मीर प्रश्न धार्मीक बाब नसुन राजकीय तसेच प्रशासकिय बाब आहे. मात्र पाकिस्तान भारतविराधी कारवाया करण्यात अग्रेसर राहीला.

### २००१ ते आजतागायत काश्मीर प्रश्न

अमेरिका नेहमी पाकिस्तानचे समर्थन करत असे. पण २००१ ला झालेल्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील हल्यामुळे त्यांना सुद्धा दहशतवादी कृत्य दिसुन पडले. काश्मीर प्रश्नाविषयी मध्यस्ती न करण्याच्या अमेरिका भुमिकेमुळे पाकिस्तानच्या अतिरेकी कारवाया वाढल्या होत्या. म्हणूनच भारताने अमेकिला जम्मू काश्मीर मधील दहशतवादयाचे संबंध अलकायदा संघटनेशी असल्याचे पटवून दिले. २००८ मध्ये भारतामध्ये फार मोठा दहशतवादी हल्ला झाला. त्याची पाकेमुळे काश्मीर विवादातीलच होती. अनेक सत्ताधिशांनी काश्मीरमध्ये सत्ता उपभोगली पण या प्रदेशाच्या मुलभुत विकासाकडे लक्ष दिले नाही. गुरूदासपुर–पठाणकोठ–पंपांर येतील अतेरिकी कारवायांमध्ये आणखी एक सुत्र दिसु लागले आहे. पाकिस्तानी सशस्त्र अतिरेक्यांना काही घीभेदांची मदत मिळत आहे. या हल्यांमुळे माश्मीरमधील हजारो निष्पाप लोकांना मृत्यूला सामोरे जावे लागत आहे. त्याचप्रमाणे काश्मीरातील कुपवाडा, पंचोर, गुरूदासपूर , पठाणकोट मध्ये कित्येक भारतीय जवान शहीद झालेत. काश्मीर खो–यातील परीस्थीती सुधारेल अशी अपेक्षा होती. मात्र, तसे झालेले नाही, उलट काश्मीर खो–यातील दहशतवाद वाढतानाच दिसत आहे. परकिय दहशतवादयांचे हल्ले होतच आहेत. पण पुन्हा दहशतवादयांची संख्या वाढतच आहे. अत्यंत प्रशिक्षित, जॉबांज असे भारतीय कित्येक जवान आपण सातत्याने गमावत आहोत. काही दिवसापूर्वी श्रीनगर – जम्मू महामार्गावर झालेल्या दहशतवादी हल्यात भारतीय जवानांनी पाकिस्तानच्या तीन दहशतवादयांचे मुडदे पाडले. पाकिस्तान सरकार नुसते आम्ही दहशतवादाचा खात्मा करीत आहोत, असा फॉर्स नेहमीच दाखवित आहे. आणि भारतच काश्मीर समस्येला जबाबदार आहे असे बेताल वक्तव्य करून जगापुढे आपले पितळ उघडे करीत आहेत.

### काश्मीर प्रश्न व राष्ट्रसंघ

१९४८पासुन आजपर्यंत राष्ट्रसंघाची काश्मीर प्रश्नाविषयीची भुमिका दुटप्पी दिसुन येते. म्हणुनच १९४८ ला झालेल्या सुरक्षा परीषदेबद्दल विजयालक्ष्मी पंडीत व्यथीत अंतकरणाने लिहीतात, ''सुरक्षा परीषद इतक्या शुद्र आणी पक्षपाती भावनेने काम करीत असेल याची कल्पनाही करू शकत नाही. हे लोक संपूर्ण जगाला स्वत:च्या ताब्यात ठेऊ पाहतात. त्यामुळे जगाचे तुकडे झाले तर नवल वाटायला नको. अमेरिका व इंग्लंड घाणेरडे राजकारण खेळत आहेत. हया सर्वामागील सुत्र चालक इंग्लंड आहे.'' यामुळे नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाचा भ्रमनिराश झाला. काश्मीर प्रश्न जितका जास्त गुंतागुंतीचा करता येइल असे राष्ट्रसंघाच्या वागणूकीतून दिसून येते. काश्मीरचा भुभाग भारताचा नंदनवन आहे. मात्र याला पाकिस्तान मानण्यास तयार नाही. १९४८, १९६५, १९७१, १९९९ या वर्षी भारत व पाकिस्तानमध्ये झालेल्या संघर्षात राष्ट्रसंघ काहीच करू शकला नाही. १९४८ मध्ये राष्ट्रसंघाने काश्मीर भागात शांतता प्रस्थापीत व्हावी यासाठी प्रयत्न केले. पण पुढे राष्ट्रसंघाने दूर्लक्ष केल्यामुळे काश्मीर प्रश्नाने गंभीर रूप धारण केले. पाकिस्तानचे काश्मीरवरील हल्ले वाढतच चालले होते. १९६५ मध्ये भारताने काश्मीर बाबत महत्वाची भुमिका मांडली मात्र ती अमेरिकेला रूचली नाही. सुरक्षापरीषदेवर बड्या राष्ट्राचे वर्चस्वामुळे काश्मीर प्रश्न सुटू शकला नाही हे मात्र निर्विवाद सत्य आहे. त्याचप्रमाणे १९७१ चा भारत–पाकिस्तान युद्धात अमेरिकेने सुरक्षा परीषदेत भारताला आक्रमक ठरवून दबाव वाढविला. इंदिरा गांधींनी अमेरिकेला खबरदार म्हणून सुनावले. या युद्धाने मात्र जम्मु–काश्मीरच्या सिमावादाचा प्रश्न निकाली निघाला नाही. इंदिरा गांधींनी आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची जमेची बाजू मांडून पाकिस्तान आपली सिमा ओलांडत आहे हे दाखवून दिले. १९९९ च्या कारगील युद्धात मात्र राष्ट्रसंघाने पाकिस्तानला फटकारले. २००१ मध्ये आपल्या भारत भेटीत संयुक्त राष्ट्रसंघाचे सचिव कोफी अन्नान यांनी वक्तव्य करूण पाकिस्तानला जोरदार झटका दिला. ''पाकव्याप्त काश्मीर मधुन पाकिस्तानने आपले लष्कर मागे घ्यावे व भारत पाकिस्तानने संयम राखुन उभयपक्षी बोलणी करावी आणि रचनात्मक पावले उचलुन या प्रदेशातील तणाव दूर करावा.'' मात्र पाकिस्तानच्या पुरापती थांबल्या नव्हत्या २००१ ला अमेरिकेला दहशतवादी

कोण आहेत हे कळून चुकले. ''२००३ मध्ये संयुक्त राष्ट्राच्या सत्तरव्या अधिवेशनात नवाझ शरीफ यांनी म्हटले की, २००३ में तय किये गये संघर्ष–विराम पर भारत और पाकिस्तान अमल करे, दोनों ने किसीभी सुरत में एक दूसरेपर हमला न करणे का संकल्प ले।'' यातुन नवाज शरीफचा खोटारडेपणा लक्षात येतो. कारण त्यांनी आपल्या बोलण्यावर ठाम न राहता काश्मीरमध्ये अतिरेकी पाठवून हल्ले सुरूच राहीले. आमचा त्यात हात नाही. हीच भुमिका पाकिस्तानने घेतली. आतापर्यंत राष्ट्रसंघाला पाकिस्तानच्या हल्ल्याबाबतची बरीचशी पुरावे भारताने दिली. २६/११ च्या हल्ल्यातील दोषी आतंकवादी अजमल कसाब हा पाकिस्तानचा रहिवाशी होता हे पुराव्यानिशी सिद्ध केले. गेल्या ६८ वर्षापासुन जम्मु–काश्मीरचा प्रश्न राष्ट्रसंघात पडून आहे. हे मात्र तितकेच सत्य आहे.

**निष्कर्ष :–**

काश्मीर हा भारताचा अविभाज्य अंग आहे. तरीही पाकिस्तान काश्मीर मिळविण्यासाठी अनेकदा आक्रमण केले पण त्यांना पराभवच हाती लागला. काश्मीर प्रश्न सोडविण्यास राष्ट्रसंघाची इच्छा दिसुन येत नाही. अमेरिकेच्या दबावात येवुन राष्ट्रसंघ काश्मीर प्रश्नाबाबत काहीच निर्णय घेऊ शकला नाही. अमेरिकेने स्वत:च्या फायदयासाठी पाकिस्तानच्या बाजुने नेहमिच उभा राहीला. त्यामुळे काश्मीर समस्या आजही तीव्र होत चालली आहे. आजही काश्मीर खो–यातील लाखो लोग हिंसाचाराला सामोरे जात आहेत. त्याचप्रमाणे काश्मीरच्या विकासाला खीळ बसली. पाकिस्तान जरी आम्ही दहशतवादी संघटनांवर बंदी घालू अशी ओरड करीत असला तरी पडदयामागुन दहशतवादयांना सहकार्य करीत आहे. त्याचप्रमाणे भारतातील गुप्तचर यंत्रणा अधिक कार्यक्षम करूण हल्ले होण्याआधीच दहशतवादयांच्या तळावर जावून खात्मा करण्याची व्यूहनीती आखण्याची गरज आहे. म्हणुनच दहशतवादी हल्ल्यांना भारताकडून जशास तसे नव्हे तर अधिक आक्रमक उत्तर मिळणार नाही, तोवर सिमेपलीकडून होणारे हल्ले थांबण्याची शक्यता नाही. नाहीतर राष्ट्रसंघाने सामंजस्याची भुमिका घेवुन काश्मीर प्रश्न सोडवावा. नाहीतर येणाऱ्या काळात भारत पाकीस्तान यांच्यात अणवस्त्र युद्ध हाईल. हे मात्र सत्य आहे.

**संदर्भग्रंथ :**

1) ग्रोवर बी.एल., आधुनिक भारताचा इतिहास, एस चंद कंपनी., नवी दिल्ली, प्र.आ. 2003.
2) रायपूरकर डॉ. वसंत, आंरराष्ट्रीय संबंध, मंगेश प्रकाशन नागपुर, 1967.
3) कोठेकर डॉ. शांता, आधुनिक भारताचा इतिहास (1947–2000), साईनाथ प्रकाशन, नागपुर 2010.
4) रोडे डॉ. सोमनाथ, आधुनिक भारत (1818 – 1975), पिंपळापूरे प्रकाशन, नागपुर.
5) आचार्य डॉ. धनंजय, आधुनिक जग, साईनाथ प्रकाशन, नागपुर 2010.
6) दिक्षीत प्रा.नि.सी., भारताचा इतिहास, (1761–1971), पिंपळापूरे प्रकाशन, चौथी आ. 2015 नागपुर.
7) महाजन,ब्रिगेडीयर हेमंत, यांचा लेख 'काश्मिरी कुरापतखोर', दै.तरुण भारत 6 मार्च 2016.
8) मराठे,सतिश भा., यांचा लेख 'भारता भोवतीचा फास', दै. तरुण भारत 6 मार्च 2016.
9) भोगले डॉ. शांताराम, भारताचे परराष्ट्र धोरण , विदया प्रकाशन, नागपुर 2014.
10) डॉ. चंद्रशेखर दिवान, भारताची विदेश निती, विदया प्रकाशन, नागपुर 1992.
11) V.P. Dutt, Indian foreign policy since Independence, NBT 2007.
12) Bipin chandra, India since Independence, New Delhi. 2004.